हाण्यासाठी विचारधारा सोडणाऱ्या उद्धव ठाकरे यांना त्यांची जागा दाखवून दिली,'' असे जोरदार टीकास्त्रही त्यांनी सोडले.

भाजपच्या 'महाविजय' अधिवेशनाच्या समारोपप्रसंगी अमित शहा यांनी राज्यभरातून आलेल्या पदाधिकाऱ्यांसोबत संवाद साधला. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, कार्यकारी प्रदेशाध्यक्ष आमदार रवींद्र चव्हाण, राष्ट्रीय सरचिटणीस विनोद तावडे, मंत्री नितीन गडकरी, केंद्रीय मंत्री मुरलीधर मोहोळ, विधान परिषदेचे सभापती राम शिंदे, जलसंपदामंत्री राधाकृष्ण विखे पाटील आणि राज्यभरातून आलेले आमदार, खासदार, मंत्री उपस्थित होते.

> मुंबईसह सर्व महानगरपालिका, नगरपालिका व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत असाच महाविजय संपादन करण्यासाठी कार्यकर्त्यांनी सज्ज व्हावे. पंचायतीपासून ते पार्लमेंटपर्यंत भाजप हा आपला नारा आहे.
> - अमित शहा, केंद्रीय गृहमंत्री

विरोधकांवर टीका करताना अमित शहा

पान ८ वर >

शिर्डी : भाजप महाविजय अधिवेशनात केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांचा सत्कार करताना जल... पाटील. समवेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे व इतर.

## 'अराजकतावाद्यांच्या कारवाया मो...

''पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा पराभव करता येत नाही म्हणून विरोधकांनी विधानसभा निवडणुकीत अराजकतावादी शक्तींसोबत हातमिळवणी केली. त्यातून 'व्होट जिहाद'सारखे प्रकार घडले. राष्ट्रीय विचारांच्या शक्तींनी विधानसभा निवडणुकीत अराजकतावादी शक्तींवर मात केली. मात्र त्यांच्या कारवाया थांबलेल्या नाहीत. सामाजिक वीण विस्कटवून दुफळी माजवण्याचा प्रयत्न होतो. तो थांबवावा लागेल. बांगलादेशी घुसखोरांची नावे मतदारयादीत घुसविण्याचे प्रकार सुरू आहेत. मात्र एकही बांगलादेशी घुसखोर महाराष्ट्रात राहणार नाही,'' असा इशारा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिला.

भाजप महाविजय अधिवेशनात राज्यभरातून आलेल्या

पान ८ वर >

# सायबर सुरक्षेवर विद्यापीठांत अभ्यासक्रम

## राज्यपाल राधाकृष्णन : राज्यातील कुलगुरूंची बैठक घेणार

**पुणे, ता. १२ :** 'सध्या सायबर सुरक्षा हा गंभीर प्रश्न बनला आहे. ऑनलाइन फसवणुकीच्या घटना वाढत आहेत. या पार्श्वभूमीवर राज्यातील सर्व कुलगुरूंची बैठक घेऊन विद्यापीठांत सायबर सुरक्षेचे अल्पकालीन अभ्यासक्रम सुरू करण्याबाबत चर्चा करू,' अशी माहिती राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी दिली.

सायबर सुरक्षेसाठी उत्कृष्ट कार्यासाठी 'क्विक हिल फाउंडेशन'तर्फे दिल्या जाणाऱ्या 'सायबर सुरक्षेसाठी सायबर शिक्षा' पुरस्कारांचे वितरण रविवारी (ता. १२) राज्यपाल राधाकृष्णन यांच्या हस्ते झाले. यावेळी

पान ५ वर >

### सायबरयोद्ध्यांचे कौतुक

- राज्यपाल राधाकृष्णन म्हणाले की, ''भारतासह जगभरातील देशांसाठी सायबर सुरक्षा ही सर्वात गंभीर समस्या बनली आहे. आज आर्थिक व्यवहारासाठी, रक्कम देण्यासाठी आणि स्वीकारण्यासाठी आपण डिजिटल तंत्रज्ञानावर अधिकाधिक अवलंबून आहोत. ५४ लाख लोकांना सायबर सुरक्षेबाबत जागरूक केल्याबद्दल फाउंडेशन आणि क्विक हिल टेक्नॉलॉजिजचे अभिनंदन.''

# ...री, बाजरीपासून आइस्क्रीम

## ...न्यापासून २० वेगवेगळे प्रकार

...१२ : लहान मुलांपासून ज्येष्ठ नागरिकांपर्यंत प्रत्येकाला ...वडते. बाजारात विविध प्रकारच्या आइस्क्रीम आपण बघतो. ...ारात एका वेगळ्या आइस्क्रीमची चर्चा सुरू आहे ती म्हणजे ... आणि नाचणीपासून बनविलेल्या आइस्क्रीमची.

...क्रीडा मंच येथे राज्य कृषी पणन मंडळाच्या वतीने मिलेट ...योजन करण्यात आले होते. 'एलिट फूड्स अँड क्रीम कंपनी'ने ... चवींची (फ्लेवर) आइस्क्रीम बनवली आहेत. यात आंबा, ...ा, जांभूळ, चॉकलेट, फिल्टर कॉफी अशा प्रकारांचा समावेश ...क्रीम तमिळनाडू येथील त्रिची येथे बनवली जाते. तिची विक्री ...णा, कर्नाटक आणि आता महाराष्ट्र राज्यांत केली जाते. ...टे म्हणाले, ''शेतकऱ्यांच्या शेतमालाला बाजारभाव मिळाला ...आम्ही अभ्यास करत होतो. आमच्या टीमने त्रिचीमध्ये सिरी या ...शोधन केले. त्यानंतर ही आइस्क्रीम बाजारात आणली. सध्या ... आइस्क्रीमला जो प्रतिसाद मिळत आहे, ते पाहून आम्ही ..., तसेच मिलेट शेकदेखील बाजारात आणणार आहोत.''




### ...पणन मंत्र्यांकडून कौतुक...

...श्री जयकुमार रावल यांनी या आइस्क्रीमचा आस्वाद ...म्हणाले, ''भरड धान्यापासून बनविण्यात आलेले अनेक




# आ. डॉ. विश्वजीत कदम

**कार्यवाह** - भारती विद्यापीठ,
**प्र-कुलगुरू** - भारती विद्यापीठ (अभिमत विश्वविद्यालय), पुणे
**माजी मंत्री**, महाराष्ट्र राज्य

घराघरात ज्ञानाचा दीप उजळावा
आणि शिक्षणाच्या माध्यमातून समाज समृद्ध व्हावा
यासाठी अविरत झटणाऱ्या ज्ञानदात्यास वाढदिवसाच्या

हार्दिक शुभेच्छा

शुभेच्छुक :

| | | | |
|---|---|---|---|
| ॲड. रामचंद्र उर्फ चंदुशेठ कदम<br>माजी नगरसेवक, पुणे म.न.पा. | श्री. अमीर शेख<br>माजी अध्यक्ष,<br>महाराष्ट्र प्रदेश एनएसयुआय | श्री. कुणाल राऊत<br>अध्यक्ष,<br>महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेस | श्री. सिध्दार्थ हत्तीअंबीरे<br>अध्यक्ष, महाराष्ट्र प्रदेश<br>(अनुसूचित जाती जमाती) काँग्रेस |